**महाराष्ट्र शासन**

क्रमांक-बीएड-४६१६/प्र.क्र.३६१/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४० ०३२.
दिनांक : २२ डिसेंबर, २०१६.

प्रति,
कुलसचिव,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव.

**विषय:- <u>बी. एड अभ्यासक्रम सुरु करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत</u>.
श्री मंगलमुर्ती बहुउद्देशीय क्रिडा मंडळ, पारोळा, जि. जळगाव द्वारा संचलित
श्री राजे छत्रपती संभाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव.**

संदर्भ :- National Council for Teacher's Education, Western Regional Committee
यांचे पत्र क्र. WRC/APW05328/123656/2015/136935, दिनांक २६.५.२०१५.

महोदय,

विभागीय संचालक, पश्चिम विभागीय समिती, एन.सी.टी.ई., भोपाळ यांनी त्यांच्या क्र. WRC/APW05328/123656/2015/136935, दिनांक २६.५.२०१५ अन्वये श्री मंगलमुर्ती बहुउद्देशीय क्रिडा मंडळ, पारोळा, जि. जळगाव द्वारा संचलित श्री राजे छत्रपती संभाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव या शिक्षणशास्त्र महाविद्यालयास काही अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष सन २०१५-१६ पासून वार्षिक १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह (two basic units of 50 students each) दोन वर्षांचा बी.एड अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार, खालील अटींच्या अधीन राहून श्री मंगलमुर्ती बहुउद्देशीय क्रिडा मंडळ, पारोळा, जि. जळगाव द्वारा संचलित श्री राजे छत्रपती संभाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव या शिक्षणशास्त्र महाविद्यालयास सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून वार्षिक १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह (two basic units of 50 students each) दोन वर्षांचा बी.एड अभ्यासक्रम कायम विना अनुदान तत्त्वावर सुरु करण्यास खालील अटींच्या अधीन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१) एन.सी.टी.ई., पश्चिम क्षेत्रीय समिती, भोपाळ यांच्या मान्यतेच्या पत्राची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.
२) एन.सी.टी.ई., पश्चिम क्षेत्रीय समिती, भोपाळ यांनी अभ्यासक्रमाची मान्यता रद्द केल्यास संबंधित अभ्यासक्रमासाठी शासनाने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल.
३) एन.सी.टी.ई., पश्चिम क्षेत्रीय समिती, भोपाळ यांच्या नियमाप्रमाणे अभ्यासक्रमाचे विहीत दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्नता प्रदान करावी.
४) एन.सी.टी.ई., पश्चिम क्षेत्रीय समिती, भोपाळ यांनी विहित केलेल्या अटींची पुर्तता करण्यात आल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

उर्मिला जोशी

**(उर्मिला जोशी)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रत,
(१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(२) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव,
(३) श्री मंगलमुर्ती बहुउद्देशीय क्रिडा मंडळ, पारोळा, जि. जळगाव द्वारा संचलित श्री राजे छत्रपती संभाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शाहुनगर, जळगाव,
(४)निवडनस्ती (मशि-२).